वाचले:-

१) सहाय्यक आयुक्त,माध्य.शिक्षण मुख्य कार्या. यांचे पत्र क्रमांक माध्य/शि/ 01/कावि/405/2024. दि. 19/06/2024.

२) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ति वेतन) नियम 1982 मधील नियम 10(1).

३) अधिकार प्रदान आदेश क्रमांक प्रशा/1/कावि/1175/2013.दिनांक 29/08/2013

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - 411018.
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक: साप्रवि/5/कावि/299/2024
दिनांक :- २८।०६।२०२४

विषय :- **नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तिबाबत.......**
**श्री. साबळे राजकुमार संपती, पदनाम -शिपाई,( संगणक क्रमांक** 1143)

आदेश,

श्री. साबळे राजकुमार संपती हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील शिपाई या गट ड मधील पदावर नेहरुनगर माध्य.विद्या. विभाग येथे काम करीत आहेत. दिनांक 01/06/1991 रोजी ते म.न.पा.मध्ये शिपाई पदावर रूजू झाले आहेत. त्यांच्या सेवानोंद पुस्तकामधील नोंदी नुसार त्यांची जन्मतारीख 02/06/1964 अशी असून दिनांक 01/06/2024 रोजी त्यांच्या वयास 60 वर्ष पूर्ण होत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ति वेतन) नियम 1982 मधील नियम 10(1) नुसार गट ड मधील कर्मचा-यांना वयाची 60 वर्ष पूर्ण होतील त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानानुसार मध्यानोत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे

सहाय्यक आयुक्त, माध्य.शिक्षण मुख्य कार्या.,यांनी दिनांक 19/06/2024 रोजीच्या पत्रान्वये, श्री.साबळे राजकुमार संपती, शिपाई यांचेकडून म.न.पा.चे वाहन कर्ज, संगणक कर्ज, घरदुरुस्ती कर्ज, घरबांधणी कर्ज, कामगार कल्याण निधी कर्ज व वैद्यकीय अग्रीम येणे बाकी नाही. तसेच एकुण 1044 दिवस विनावेतनी केल्याचे दिसुन येत आहे. तसेच सद्यस्थितीत त्यांची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नाही. असा अहवाल सादर केला असून,त्यांना दिनांक 30/06/2024 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस शिफारस केली आहे.

सबब, सहाय्यक आयुक्त ,माध्य.शिक्षण मुख्य कार्या.,यांचेकडील दिनांक 19/06/2024 रोजीचा अहवाल, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ति वेतन) नियमातील उक्त तरतूद विचारात घेऊन उपरोक्त वाचले क्रमांक 3 वरील आदेशान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार श्री. साबळे राजकुमार संपती, शिपाई यांना दिनांक 30/06/2024 रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

श्री. साबळे राजकुमार संपती, शिपाई यांना निवृत्तिवेतन,सेवा-उपदान इ.रकमा अदा करण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता सबंधित विभागाने करून प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी सत्वर लेखा विभागाकडे पाठवावे.लेखा विभागाने श्री. साबळे राजकुमार संपती, शिपाई यांचेकडून महापालिकेस घरबांधणी कर्ज,वाहन कर्ज, संगणक कर्ज, वैद्यकीय अग्रीम,इत्यादी पैकी अथवा अन्य काही रक्कम येणे बाकी आहे काय?या बाबत खातरजमा करावी व त्यांचे कडून काही येणे बाकी रक्कम असल्यास , ती त्यांना देय असलेल्या रकमेतून वसूल करून अंतिमत: देय रक्कम त्यांचे सेवानिवृत्तिचे दिनांकास अदा करावी.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री. साबळे राजकुमार संपती पदनाम -शिपाई यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

सही/-
उप आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - 411018.

प्रति,

**श्री. साबळे राजकुमार संपती, पदनाम-शिपाई**

माध्य.शिक्षण मुख्य कार्या. विभाग,

प्रत :- 1) लेखा विभाग 2) मुख्य लेखापरिक्षण 3) वैयक्तिक नोंद कक्ष 4) गोपनिय अहवाल कक्ष 5) सेवाज्येष्ठता कक्ष 6) मागासवर्ग कक्ष 7) संगणक कक्ष - सामान्य प्रशासन 8) विद्युत विभाग 9) दूरसंचार विभाग 10) कामगार कल्याण विभाग 11) पि. चि. म. न. पा. कर्मचारी महासंघ 12) पि. चि. म. न. पा. सह. पतसंस्था

13) माध्य.शिक्षण मुख्य कार्या. विभाग

2/- सोबत श्री. साबळे राजकुमार संपती पदनाम -शिपाई यांचे सेवानोंद पुस्तक आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

सहा.आयुक्त, 21.05.24

सामान्य प्रशासन विभाग

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी ४११ ०१८